जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नंदुरबार

(जिल्हा न्यायालय आवार, टोकर तलाव रोड, नंदुरबार)

जाहिरात दिनांक: १६/०४/२०२६
अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख: **२४/०४/२०२६** संध्याकाळी ०५.३० वाजेपर्यंत

<u>कंत्राटी चालक</u>

नंदुरबार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण करीता कंत्राटी चालक पद निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात भरावयाचे आहे.

<u>चालक पदासाठीच्या अटी व शर्ती</u>

१. उमेदवार १० वी उत्तीर्ण असावा.

२. उमेदवाराकडे जाहिरात प्रसिध्दीच्या तारखेस वैध व कार्यरत हलके मोटर वाहन (LMV) चालविण्याचा परवाना असावा.

३. उमेदवार नंदुरबार जिल्ह्याचा रहिवासी असावा.

४. उमेदवाराविरूध्द कुठलेही फौजदारी प्रकरण न्यायालयात प्रलंबित नसावे किंवा त्यास कुठल्याही फौजदारी प्रकरणात शिक्षा झाली नसावी.

५. उमेदवार वाहन देखभाल व सर्वसाधारण दुरूस्तीचे प्राथमिक ज्ञान असावे.

६. अर्ज करण्याच्या तारखेस उमेदवार, सर्वसाधारण प्रवर्गाकरिता २१ वर्षापेक्षा कमी वयाचा आणि ३८ वर्षापेक्षा जास्त वयाचा नसावा आणि अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, इतर मागासवर्ग किंवा महाराष्ट्र शासनाव्दारे २८/०३/२०१८ रोजी त्यावेळेपुरत्या विनिर्दिष्ट केलेल्या मागास प्रवर्गाकरीता ४३ वर्षापेक्षा जास्त वयाचा नसावा. वयात सुट मिळण्यासाठी जातीचा दाखला सादर करावा.

७. वाहन चालविण्याचे अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

८. वाहन चालकास मद्यपान/तंबाखु/गुटाख्याचे व्यसन नसावे, तसेच आढळून आल्यास चालकाची सेवा त्वरीत खंडीत करण्यात येईल.

९. चालकास दर आठवड्याल्या एक साप्ताहीक रजा मंजुर केली जाईल. सदर रजेचा दिवस कार्यालयीन सोयीनुसार असेल.

१०. सदरचे पद ही निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाचे असून मा. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांचेकडील निर्देशास अधिन राहुन भरती करण्यात येत आहे.

११. उमेदवारांनी विहीत नमुन्यातील अर्ज, हमीपत्र, लहान कुटुंबाचे नमुना—अ प्रमाणे स्वयंघोषणापत्र, प्रतिज्ञापत्र, दिनांक २४/०४/२०२६ संध्याकाळी

०५.३० वाजेपर्यंत प्रत्यक्ष अथवा नोंदणीकृत डाकेने जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नंदुरबार या कार्यालयाचे पुढील पत्यावर पोहचतील अशाप्रकारे दाखल करावा. त्यानंतर आलेल्या अर्जाचा कोणत्याही प्रकारे विचार केला जाणार नाही.

अर्ज दाखल/ सादर करण्याचा/पाठविण्याचा पत्ता:—

सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,
जिल्हा न्यायालय परिसर, टोकरतलाव रोड,
नंदुरबार—४२५४१२.

१२. अर्जावर/ पोष्टाच्या लिफाफयावर चालक या पदाकरीता अर्ज केला आहे ते स्पष्टपणे नमूद करावे.

१३. अर्जासोबत शैक्षणिक पात्रतेबाबत बाबत शाळा सोडल्याचा दाखला किंवा गुणपत्रक किंवा शैक्षणिक प्रमाणपत्र, अनुभवाबाबत आवश्यक प्रमाणपत्र, वाहन चालवण्याचा परवाना व दस्ताऐवजांच्या प्रती दाखल करावेत.

१४. निवड करण्यात आलेल्या उमेदवाराने प्राधिकरणाकडे करारनामा लिहून दयावयाचा आहे.

१५. नेमणूकीनंतर उमेदवारास कोणतेही कारण न देता व कोणतेही पूर्व सूचना न देता नोकरीतून कमी करण्याचा अधिकार प्राधिकरणास राहील.

१६. उमेदवारास नेमणूकीच्या कालावधीपूर्वी नोकरी सोडावयाची असल्यास दोन महिन्याचे आगाऊ सूचना किंवा एक महिन्याचा ढोबळ /स्थूल मानधन या प्राधिकरणाकडे जमा करावा लागेल.

१७. एकत्रित मानधन हे किमान वेतन कायद्याप्रमाणे तसेच मा. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांनी वेळोवेळी ठरवून दिल्याप्रमाणे असेल.

१८. पात्र उमेदवारांची यादी दिनांक ०५/०५/२०२६ रोजी जिल्हा न्यायालय, नंदुरबार यांचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

१९. भरती प्रक्रियेच्या माहिती करीता अर्जदाराने जिल्हा न्यायालय, नंदुरबार यांच्या अधिकृत संकेतस्थळ https://nandurbar.dcourts.gov.in यास भेट दयावी.

२०. पात्र उमेदवारांची दिनांक ०८/०५/२०२६ रोजी दुपारी ०२.०० वाजता २० गुणांची वाहन चालवण्याबाबत कौशल्य चाचणी व सायंकाळी ०५.३० वाजता ३० गुणांची तोंडी मुलाखत जिल्हा न्यायालय, नंदुरबार येथे घेण्यात येईल. पात्र उमेदवारांनी त्यादिवशी दुपारी ०१.०० वाजता मुळ

कागदपत्रासह जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय परिसर, टोकरतलाव रोड, नंदुरबार–४२५४१२ येथे उपस्थित रहावे.

२१. भरती प्रक्रियेबाबत कुठलीही माहिती उमेदवारांना https://nandurbar.dcourts.gov.in या संकेतस्थळावरून कळविण्यात येईल, त्यासाठी उमेदवारांनी वेळोवेळी सदर संकेतस्थळावर भेट द्यावी. त्याबाबत उमेदवारांना स्वतंत्र्यरित्या कुठलिही सुचना दिली जाणार नाही.

२२. वाहन चालविण्याचे कौशल्य व समितीच्या अध्यक्ष व सदस्यांनी मुलाखतीत केलेल्या एकत्रित गुणांकणाच्या आधारावर सर्वात जास्त गुण प्राप्त करणा–या उमेदवाराच्या नावाची निवड यादी व दोन उमेदवारांच्या नावाची प्रतिक्षा यादी तयार करण्यात येईल.

२३. सदर भरती प्रक्रिया व पदासाठीची नियुक्ती मा. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांच्या मंजुरीच्या व पुढील निर्देशाच्या अधीन राहून करण्यात येईल.

<u>जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नंदुरबार अंतर्गत</u>

नुकतेच
काढलेले
पासपोर्ट साईज
फोटो

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नंदुरबार करीता निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी चालक पदासाठी अर्ज करण्याचा नमुना.

१. अर्जदाराचे संपुर्ण नावं व पत्ताः—...

२. जन्म तारीखः— ..../ ...../ ....
३. मोटार वाहन चालविण्याचा परवाना क्रमांक ....

४. मोबाईल क्रमांक व ई—मेल आयडीः— ....
....

५. शैक्षणिक अर्हताः—

अ. क्र	शैक्षणिक अर्हता	विद्यापीठ	उत्तीर्ण वर्ष	टक्केवारी

६. अनुभव — ....

७. सोबत कागदपत्रांचा स्वयंसाक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

अर्जदाराचे हमीपत्र

मी, याव्दारे, घोषिती करतो/करते की, मी अर्जात दिलेली वरील सर्व माहिती बरोबर आहे आणि जर काही चुकीचे आढळले तर माझी उमेदवारी रदद होईल, याची मला जाणीव आहे.

ठिकाण :—
दिनांकः—

उमेदवाराची स्वाक्षरी

<u>नमुना “अ”</u>

मी श्री/श्रीमती ———————————————————————————————

राहणार———————————————————————————————यावद्‌ारे पुढीलप्रमाणे जाहीर करतो / करते की,

१. मी कंत्राटी चालक या पदासाठी माझा अर्ज सादर केला आहे

२. आज रोजी मला ———————(संख्या) इतकी मुले आहेत. यापैकी दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ——— आहे (असल्यास जन्मदिनांक नमुद करावा)

३. हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अपात्र होईन याची मला जाणीव आहे.

स्थळ :—

दिनांक:—　　　/　　　/

उमेदवाराची स्वाक्षरी

<u>प्रतिज्ञापत्र</u>

मी अर्जदार ———————————————————— याव्दारे प्रतिज्ञापुर्वक जाहीर करतो/ करते की/ सांगतो/ सांगते की, मी नंदुरबार जिल्ह्याचा रहिवासी आहे. मला कधीही अटक झालेली नाही तसेच माझे विरूध्द कोणतेही फौजदारी प्रकरण प्रलंबित नाही किंवा / तसेच मला कोणत्याही फौजदारी न्यायालयाने दोषी ठरवून शिक्षा ठोठावलेली नाही किंवा माझे विरूध्द कुठलाही गुन्हा दाखल नाही.

स्थळ :—

दिनांक:— / /

अर्जदारचे नाव व सही